# मा. दिवाणी न्यायाधीश साहेब, क .स्तर
# अंबाजोगाई यांचे न्यायालयात

Exh-10/B

**नियमित दि.दा. क्र.७९/२०२६**

**विष्णु विरुध्द भाग्यश्रीबाई व इतर**

**दावा :- मालकी घोषीत करून मिळणे बाबत.**

## समजपत्र/तडजोडपत्र

**सदरील प्रकरणात वादी व प्रतिवादी यांचे तर्फे खालीलप्रमाणे समजपत्र/तडजोडपत्र सादर करण्यात येत आहे.**

१) हे की, वादी व प्रतिवादी हे आपसात सख्खे भाऊ बहिण आहेत, हे वादी व प्रतिवादी यांना मान्य व कबूल आहे.

२) हे की, वादी व प्रतिवादी यांच्या हिंदु एकत्र कुटुंबाची घर मिळकत मौजे कुत्तर विहीर, अंबाजोगाई येथील नगर परिषद हद्दीतील जुना घर क्र.२-२८५ चा नवीन घर क्र.२-३०४ क्षेत्रफळ २५ X २५ फुट ही घर मिळकत वादी व प्रतिवादी यांची वडीलोपार्जित मिळकत आहे. वादग्रस्त मिळकतीच्या चतु:सिमा पुढील प्रमाणे पूर्वेस :- ५ फुट रस्ता व त्यालगत काळदाते यांचे घर पश्चिमेस :- शिंदे यांचे घर, दक्षिणेस :- वादी यांची व त्यांच्या भावकीची एकत्रित वापरासाठी ठेवलेली खुली जागा, आणि उत्तरेस :- रस्ता या आहेत. हे वादी व प्रतिवादी यांना मान्य व कबूल आहे.

३) हे की, वादी व प्रतिवादी हे हिंदू एकत्र कुटुंबाचे सदस्य असून वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये वडीलांच्या मृत्युनंतर सन २०१५ मध्ये वडीलोपार्जित वादग्रस्त मिळकतीची तोंडी वाटणी झालेली होती. प्रतिवादी क्र.१ व २ यांचा विवाह झालेला असून त्या त्यांच्या सासरी नांदत असल्यामुळे त्यांनी वडीलोपार्जित मिळकतीतील

विष्णु कदम

Thumb of Vijaymala.

Thumb of Bhagyashreebai

Thumb identified by me.
12/03/2026 Adv. for defendant

त्यांचा हिस्सा वादी यांच्या हक्कात सोडला असल्यामुळे वादी यांना संपुर्ण घरजागा देण्यात आली होती. त्याप्रमाणे वादी व प्रतिवादी यांच्या मधील तोंडी वाटणीनुसार वादग्रस्त मिळकतीतील वादी यांना वाटून आलेल्या संपुर्ण हिश्याचा ते उपभोग घेत होते व आहेत. परंतु वादग्रस्त मिळकत ही वादी व प्रतिवादी यांचे मयत वडील नामे रंगनाथ पि. राम कदम यांच्या नावे महसूल अभिलेखात (पी.टी.आर.उतारा) नोंद आहे हे वादी व प्रतिवादी यांना मान्य व कबूल आहे.

४) हे की, वादी व प्रतिवादी यांची सरस निरस मानाने तोंडी वाटणी झालेली असून संपुर्ण वादग्रस्त मिळकत ही वादी यांच्या हिश्यास आलेली असून त्यावर वादी यांचा ताबा आहे. त्यामुळे वादी यांची मालकी घोषीत करून नमूद वादग्रस्त मिळकतीचे वादी हे मालक व कब्जेदार असल्याचे घोषीत करणे गरजेचे आहे, हे वादी व प्रतिवादी यांना मान्य व कबूल आहे.

**वादी व प्रतिवादी यांच्या तडजोडीप्रमाणे तसेच तथाकथित तोंडी वाटणी मध्ये ठरल्याप्रमाणे :-**

अ) वादी विष्णु पि. रंगनाथराव कदम यांच्या हिश्यास मौजे कुत्तर विहीर, अंबाजोगाई येथील नगर परिषद हद्दीतील जुना घर क्र.२-२८५ चा नवीन घर क्र.२-३०४ क्षेत्रफळ २५ X २५ फुट ही वडीलोपार्जित घर मिळकत वरील नमूद मुद्दा क्र.२ मधील चतु:सिमेच्या आतिल संपुर्ण घर जागा देण्यात आलेली आहे, हे वादी व प्रतिवादी यांना मान्य व कबूल आहे.

ब) प्रतिवादी क्र.१ नामे भाग्यश्रीबाई भ्र. बालू जगताप (पूर्वाश्रमीचे नाव भागयश्रीबाई पि. रंगनाथ कदम) यांच्या हिश्यास तसेच प्रतिवादी क्र.२ नामे विजयमाला भ्र. प्रकाश फावडे (पूर्वाश्रीमीचे नाव विजयमाला पि. रंगनाथ कदम) या दोघीही स्वत:च्या सासरी सुखाने नांदत असून त्यांना दाव्यातील संपुर्ण वडीलोपार्जित मिळकतीतील कुठलाही हिस्सा नको असल्याने त्यांनी स्वखुशीने स्वत:चा कायदेशीर

I know defendant Thumb
12/03/2026

विष्णु कदम

Thum of Vijaymala

Thum of Bhagyashreebai

हिस्सा वादी यांच्या हक्कात सोडून दिलेला होता. त्यामुळे वादी हेच संपुर्ण मिळकतीचे मालक व कब्जेदार आहेत, हे वादी व प्रतिवादी यांना मान्य व कबूल आहे.

५) हे की, सदरील तडजोडपत्र/समजपत्र आधारे वर नमूद वडीलोपार्जित मिळकतीच्या झालेल्या तोंडी वाटणी प्रमाणे वादी हे स्वत:चे नाव महसूल अभिलेखात तसेच पी.टी.आर. उताऱ्यावर मालकी रकान्यात लावून घेतील. त्यामध्ये प्रतिवादी क्र.१ व २ या हरकत अडथळा तसेच वाद उपस्थित करणार नाही, हे वादी व प्रतिवादी यांना मान्य व कबूल आहे.

## तरी विनंती की,

वादी यांचा दावा समजपत्र/तडजोडपत्र आधारे निकाली काढण्यात यावा.

दिनांक :- १२/०३/२०२६

प्रतिवादी

१) **भाग्यश्रीबाई भ्र. बालू जगताप**

२) **विजयमाला भ्र. प्रकाश फावडे**

मार्फत

Dehere

**ॲड. छाया शे. देहरे**

वादी

विष्णु कदम

**विष्णु पि.रंगनाथ कदम**

मार्फत

Bavane

**ॲड. विश्वास गं. बावणे**

Thumb identified me.
12/03/2026